MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™



Education Through Self-help is Our Motto

Rayat Shikshan Sanstha's



NATIONAL SEMINAR

ON

# "EMERGING CHALLENGES & OPPORTUNITIES IN INDIAN ECONOMY"

Organised by

## Dr. Babasaheb Ambedkar College, Aundh, Pune.

27 – 28th February 2020

संपादक

प्रा. नलिनी पाचर्णे

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

SPECIAL ISSUE FEB-2020

# विद्यावार्ता ®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal





# DR.BABASAHEB AMBEDKAR COLLEGE

Aundha, Pune
(Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune)
**NAAC Re-Accredited with**
**B++ (CGPA 2.76) & ISO Certified**

Department of Economics
Savitribai Phule Pune University, Pune
*Deparment of Planning & Development*
Under Quality Improment Program

## NATIONAL SEMINAR ON

## "An Emerging Challenges and Opportunities In India Economy"

**Prof.Dr.Sanjay Nagarkar**
Vice Principal

**Dr.Shivling Menkudale**
Principal

**Dr.Harshad Jadhav**
Co-ordinator

**Prof.Nalini Pacharne**
Co-ordinator

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

215

# INDEX

01) Challanges and Opportunities of Indian Economy
Prof. Dr. J. F. Patil ||13

02) Current Situation of the Indian Economy: Focussing on Macro Economics ...
Dr. H. H. Bharadi, Dharwad, Karnataka state ||15

03) GST and its Impact on Indian Economy
DR. S. B. Akash, Belagavi, Karnataka ||16

04) CHALLENGES IN BANKING & FINANCIAL SECTOR
Dr. Makarand Chikodikar, Ponda – Goa ||21

05) Trends, Issues and Challenges of Foreign Direct Investment in India
Dr. Pravin Jadhav ||24

06) महिलांचे आर्थिक सक्षमीकरण
डॉ. के. एच. शिंदे & डॉ. एन. सी. पवार, जि. अहमदनगर ||26

07) इंधनाच्या वाढत्या किंमतीतील बदलांच्या प्रवाहांचा अभ्यास
प्रा. प्रकाश कृष्णा टोणे & कु. माधुरी परशराम देशमुख, जि. सातारा ||30

08) भारतातील बेकारीच्या सद्यस्थितीचा अभ्यास
डॉ. सीमा रवींद्र चव्हाण, पुणे ||32

09) आर्थिक विकासवाद व विस्थापित समस्या
डॉ.प्रा. संजय पांडुरंग नगरकर, पुणे ||36

10) भारतातील सार्वजनिक आरोग्य : सद्यस्थिती आणि भवितव्य
प्रा. नलिनी विठ्ठल पाचर्णे, पुणे ||39

11) वाढती महागाई : सद्य परिस्थिती
प्रा. अमरदीप प्रमोदराव गुरमे, पुणे ||43

12) भारतीय अर्थव्यवस्थेची सद्य:स्थितीत
प्रा. बर्वे सिद्धार्थ भागाजी, जि. अहमदनगर ||46



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67.

216

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | February 2020 Special Issue | 036

उचलली पाहिजेत.

**(xi) औद्योगिक क्रियांचे विकेंद्रीकरण:**

बेरोजगारी कमी करण्यासाठी औद्योगिक कार्याचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. औद्योगिक उपक्रम एकाच ठिकाणी केंद्रीकृत झाल्यास, विकसनशील क्षेत्रात नोकरीच्या संधी कमी असतील. तर सरकार औद्योगिक क्रियांच्या विकेंद्रीकरणाला प्रोत्साहित करणारी अशी धोरणे अवलंबली पाहिजेत.

**(xii) लोकसंख्या नियंत्रण:**

बेरोजगारी,समस्या सोडवण्यासाठी लोकसंख्येच्या वाढीची तपासणी केली पाहिजे. कुटुंब नियोजन कार्यक्रम व्यापक आणि प्रभावीपणे राबविला गेला पाहिजे.

**निष्कर्ष.** कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी बेरोजगारी ही एक गंभीर समस्या आहे. हे बेरोजगारांवर नकारात्मक परिणाम घडविते कारण ते बेरोजगार आहेत आणि नवीन नोकरी शोधण्याच्या वाईट प्रवृत्तीमुळे त्रस्त आहेत आणि जे नोकरी करतात त्यांना भविष्यात नोकरी ठेवणे कमी सुरक्षित वाटते. भारतातील लोकांना उत्तम दर्जाची रोजगारसंधी मिळण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. त्यांच्या कौशल्याचा दाखला, नेमके औद्योगिक धोरण आणि राष्ट्रीय रोजगार धोरण असणे आवश्यक आहे. देशांतर्गत स्पर्धेला चालना देणे देखील गरजेचे आहे. याशिवाय, परकीय स्पर्धेपासून एतद्देशीय उद्योगांचे संरक्षण करणे देखील आवश्यक ठरते. असंख्य चिनी उत्पादनांमुळे येथील अनेक लघु उद्योग उध्वस्त झाले असल्याने याची नेमकी गरज भासते. शासनाने निर्यातीस चालना देणे आणि आयात पर्यायीकरणन करणे प्राप्त आहे.

**संदर्भ**

१. नियतकालिक कामगार बल सर्वेक्षण (२०१६–२०२०) (पीडीएफ) . कामगार आणि रोजगार मंत्रालय. पी २१२. ३ मे २०१६

२. Marathiinfopedia MAY 5, 2019 TAKMUKTESHWARLEAVE A COMMENT

३. जयश्री सेनगुप्ता १६ डिसेंबर २०१८ वाढत्या बेरोजगारीचे गंभीर आव्हान

४. इंडिया बेरोजगारी दर २०१८–२०२० डेटा । २०२१–२२ अंदाज। कॅलेंडर। ऐतिहासिक

५.https://brainly.in/question/8669591 #readmore

09

# आर्थिक विकासवाद व विस्थापित समस्या

**डॉ.प्रा. संजय पांडुरंग नगरकर**
उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे

**१.१. प्रास्ताविक:**

भय, भूक आणि मैथुन ह्या माणसाच्या आदिम प्रेरणा. आजही जगात जे काहीचालले आहे तेह्या प्रेरणांच्या पूर्तिसाठीच. रस्त्यावरची लढाई हे दाहकवास्तव आज जगातील प्रत्येक मानवसमूह अनुभवत आहे. हीवेळ मानवप्राण्यावर कायावी, असा प्रश्न जेव्हा पडतो; तेव्हा मोह, स्वार्थ, महत्त्वाकांक्षा, अविवेक.... अशी अनेक मानसिक कारणे त्यामागे असल्याचे निदर्शनास येते. टॉलस्टॉय म्हणतो, माणसाला फक्त साडेतीनहातच जमीन लागते. परंतु नेमके तेच माणूस विसरतचालला आहेकिंवा कळत असूनहीवळत नाही, असेदिसते. स्थलांतर हा माणसाचा स्थायी गुणधर्म. पूर्वी माणसे पाण्याच्या जागा पाहून, जंगलात लागणाऱ्या आगींमुळे स्थलांतरित व्हायची. पुढे सत्ताकांक्षा, दुसऱ्या टोळ्यावा भूप्रदेशावर वर्चस्व गाजविण्यासाठी ती आक्रमणे करायची. मूलनिवासी लोकांना पळवून लावायची. त्यानिमित्ताने स्थलांतर घडायचे. साम्राज्यवादाच्या उदयानंतर ही भूक अधिकवाढली. हळूहळू औद्योगिक क्रांतीवरेनेसान्सह्या दोन्हीगोष्टी एकापाठोपाठ घडल्या व आपल्या न्याय-हक्कांसंदर्भात देशोदेशीचेलोक जागृत झाले. अस्मिता जागृतीतून स्वातंत्र्यलढे यशस्वी होऊ लागले. परंतु पाठोपाठ भांडवलशाही अर्थव्यवस्था ही दृढमूल झाली. त्यातूनच स्थलांतराची जागा विस्थापना ने घेतली. कारणस्थलांतरे ही जाणीवपूर्वक व स्वयंस्फूर्तीने व्हायची. विस्थापन हे लादले गेलेले आहे. अस्मानी वसुल्तानीसंकटांचे फलित म्हणून विस्थापित ही संकल्पना दृग्गोचर झाली आहे

**२. आर्थिक विकासवाद व विस्थापित समस्या :**

नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या विस्थापनाचे खापर दैवावरवानिसर्गावर फोडून आपण मोकळे होतो. परंतु स्वत:च्याच हाताने स्वत:ची चिता जाळल्यासारखे मानवनिर्मित विस्थापनाचा



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

217

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | February 2020 Special Issue | 037
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

...च कोणाला, हा प्रश्न पुढे येतो. काहीतरी प्राप्त करण्यासाठी ...गमवावे लागते, एखादा डोंगर उभा करण्यासाठी तेवढ्याच ...चाखड्डा खणल्याशिवाय डोंगर उभा राहत नाही ह्या ...शास्त्रीय सिद्धांतानुसारविचार करता, विकासप्रक्रिया घडवित ...मानवाने अनेकविध योजना व क्लृप्त्या लढविल्या. जसे ...ची समस्या व पाणीटंचाई ह्यावर मात करण्यासाठी व ...गरज भागविण्यासाठी मोठ्या धरणांची निर्मिती करणे, ...क वसाहतीचे महाकाय कारखानदारीत रूपांतर होणे, वाढती ...संख्या वशहरीकरणह्यांची सोय करण्यासाठी नद्या, खाड्या, ...ह्यांच्यामध्ये भराव टाकून इमारतींचे बांधकाम करणे, वाढती ...नदारीववीजटंचाईह्यावर मात करण्यासाठी अणू-पवन-सौर- ...ह्यावरीलवीज प्रकल्प आणणे, लोह- मँगेनीज-बॉक्साईट ...जांचे उत्खनन करणे, जंगलेहटवून सिमेंटच्या जंगलांची ...करणे, दळणवळणाची अत्याधुनिक सुविधा निर्माण ...साठी महामार्ग, सेतुमार्ग, उड्डाणपूल, रेल्वेमार्ग, ...ळे तयार करणे, जळण-कठण, कागदनिर्मिती, बांधकामे ...जंगलांवर अतिक्रमणे करणे, सेझ सारख्या कायद्याचा ...संपत्ती वाढविण्यासाठी त्याचा गैरवापर करणे असे ...उपद्व्याप केले आहेत. त्यासाठी धौम्यऋषीचा शिष्य ...ने पिकाची नासाडीहोऊ नये म्हणून स्वत:च्या शरीराचा ...नशेतात जाणारे पाणी अडविले, १ भगीरथाने गंगा ..., अगस्तीनेसागर प्राशन केला, विश्वामित्राने प्रतिसृष्टी ...केली, अशा पुराणकथांचा, मिथकांचा व दैववादी समाजाच्या ...तेचा समर्थनासाठी वापर केला जातो. २ परंतु ह्या अंतर्गत ...मुळे ज्या ठिकाणी प्रकल्प उभारले जातात, तेथील भूमिपुत्रांवर ...चे परागंदा होण्याची वेळ येते. अशास्थानिक भूमिपुत्रांच्या ...नास सरळसरळ शासकीय धोरणेवहितसंबंधांची जपणूक, ...भांडवलदारांची अर्थनीतीह्या बाबी कारणीभूत असतात. ...शंकर सखाराम म्हणतात, आपल्याकडे बहुतेक चांगल्या ...भांडवलदारधार्जिण्या असतात. आणि ज्या भूभागावर योजना ...ल्या जातात, तेथे प्रथम उद्ध्वस्तहोतो तोतिथला भूमिपुत्र३ ...न आई खायला देईनाव बाप भीक मागू देईना, अशी ...पितांची अवस्थाहोते. पुढे त्यातूनच अनेक ताणतणाववसंघर्ष ...होतात. गावेच्या गावे मुळातून उखडली जातात.

मानवसमूहाच्या भौतिक प्रगतीचा सर्वात क्रांतिकारक ...म्हणजे औद्योगिक क्रांतीचा उदय (१८ वेशतक) जेव्हा ...गिक क्रांतीचे पडघम वाजूलागले, तेव्हा भारत देश पारतंत्र्यात ...इंग्रजी सत्तेच्या अंमलाखाली असला, तरीह्या औद्योगिक क्रांतीनववैज्ञानिक प्रगतीने भारतातही परिवर्तन घडविले. रेल्वेपासून, कापडगिरण्यांपासून थेट आजच्या संगणकयुगापर्यंत अनेक थक्क करणाऱ्या गोष्टी निर्माण झाल्या. आज तर आर्थिकविकासवाद हा संपूर्ण जगाचाच कळीचा मुद्दा बनला आहे. सरकार नावाची शक्ती ह्या सर्वविकासवादावर नियंत्रण ठेवत असते. ह्याबाबत सत्यरंजन साठे म्हणतात, विज्ञानाच्या जोरावर माणसाचे आयुष्य जास्तसुखी करण्याचा प्रयत्न आजची सर्व लोकशाही किंवा बिगरलोकशाही सरकारे करत असतात. यालाच विकास योजना म्हणतात. धरणे बांधणे, सिंचनव्यवस्था निर्माण करणे, पोलादासारख्या धातूंची निर्मिती करवून आणणे, ह्या योजना अग्रक्रमाने हातात घ्याव्या लागतात.. पाण्याचा प्रश्न सोडवणे आवश्यक असते, वीजउत्पादन व्हायचे असते, शेतीसाठी सिंचनव्यवस्थाही त्यातून होणे शक्य असते... परंतु राजकीय हेतूने प्रेरित अशा घेतल्या जाणाऱ्या निर्णयातून फार मोठी आपत्ती उद्भवू शकते ४ विस्थापन हीदेखील काहीशी अशीच आपत्ती असल्याचे दिसून येईल. केवळ भान सुटल्यामुळेच अशा स्वरूपाच्या आपत्तींना लोकसमूहांना सामोरे जावेलागते. माधवराव चितळे ह्यांच्या मताप्रमाणे, जमीन, पाणी आणिलोकह्या तीनघटकांचा मिळून एकत्र गुंफला गेलेला एक जैवत्रिकोण निर्माण होतो. विकासाच्या कुठल्याही योजनांमध्ये ह्या तीनहीघटकांचे समन्वयित भान ठेवावेच लागते.५ आणि तेठेवले तरचह्या आपत्तींपासून आपला बचाव आहे.

ब्रिटिशकालीन भारतात आर्थिक धोरणेही समाजधार्जिणी असण्यापेक्षा सरकारधार्जिणीव भांडवली व्यवस्थेला पूरक अशीचहोती. कच्च्या मालाचे आगरव पक्क्या मालाची बाजारपेठ म्हणून इंग्रजसरकार भारतीय भूमीचा वापर करू पाहत होते. त्यात कापड गिरण्यांची वाढू लागलेली संख्या लक्षात घेऊन इ.स. १९१६ साली औद्योगिक आयोग स्थापन करण्यात आला. त्यातून भांडवलदारांचीच ताकद वाढली. सत्तेतवाटाव फायद्यासाठी त्यांनी सरकारशी हातमिळवणी करण्यास सुरुवात केली. पहिल्या महायुद्धाच्या काळात औद्योगिक उत्पादनाच्या किमती वाढू लागल्या. भारतीय कापडगिरण्यांना चालना मिळू लागली. ह्या कारखान्यांना विजेचीगरज भासू लागलीव वीजनिर्मितीच्या योजना पुढे आल्या. वीजनिर्मितीसाठी धरणांची बांधणीव Land Acquisition Act(इ.स.१८९६) चीगरज भासू लागली. टाटा उद्योगसमूहाने मुंबई शहरातील कारखाने, आगगाड्याविशेषत: वीजनिर्मिती ह्या कारणांसाठी मुळशी पेठ्यातील नीळाव मुळा संगमावर जलविद्युतनिर्मितीचा प्रकल्प उभा करण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यास सुरुवात केली. तत्पूर्वी


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★
21

भारतात इ.स. १८९७ मध्ये दार्जिलिंग येथे, तसेचइ.स. १९०२ मध्ये म्हैसूर संस्थानातील कावेरी नदीवरील वीजनिर्मिती प्रकल्प उभे केलेलेहोते. ह्यासर्व योजनांमध्ये विस्थापित होणाऱ्या भूमिपुत्रांच्या दु:खालावाचा फोडण्यासाठी फक्त मुळशी योजनेविरोधात प्रखर जनआंदोलन झाले. परंतु सरकारी बळापुढे त्यास नमते घ्यावे लागले. ज्या भूसंपादन कायद्याचा आधारघेऊन भूमिपुत्रांना विस्थापित करण्यात येई, त्या कायद्याबाबत राष्ट्रीय सभेच्या नागपूर अधिवेशनात न.चिं. केळकरांनी काढलेले उद्‌गार दूरदृष्टीचेहोते. आजच्या सेझ वगैरे प्रकरणांचा ववस्तुस्थितीचाविचार करता; त्याचा प्रत्यय येतो. न.चिं. केळकर म्हणतात, लॅंड ॲक्विझिशन ॲक्टचाहवा तसा गैरवापर करूनसरकार देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांमध्ये भांडवलदारांसाठी, विशेषत: परदेशी भांडवलदारांसाठी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादन करीत आहेव त्यायोगे गरीब लोकांच्या व जमीन मालकांच्या जमिनी, घरे-दारे, व्यवसाय उद्‌ध्वस्त करीत आहे.६

इ.स. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण शरीरानेस्वतंत्र झालो असलो, तरी मने मात्र इंग्रजाळलेलीच होती. स्वतंत्र भारताला स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी व देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी भरीव कृतिकार्यक्रमांची आवश्यकता होती. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू ह्यांच्या रूपाने आधुनिकविचारांचाव आर्थिकविकासवादाचाखंदा प्रतिनिधी देशाला लाभला. गतिमान विकासव स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी इ.स. १९५१ साली पहिली पंचवार्षिक योजना आखलीगेली. त्यानंतर सतत योजनांमागून योजना होत राहिल्या, तसेच पोलाद, लोह, रस्ते, अणुशक्ती.... अशा अनेकसार्वजनिकवखाजगी उद्योगांच्या उभारणीसही चालना देण्यात आली. कृषिक्रांती, धवलक्रांतीहे परवलीचे शब्द झाले. अर्थात देशविकासासाठी त्याग अथवा समर्पण ही मूल्ये स्वयंस्फूर्तीने स्वीकारून आपल्या वडिलोपार्जित जमिनी ठिकठिकाणच्या भूमिपुत्रांनी भावनिक नात्यासह बहाल केल्या. परंतु कालांतरानेह्या भूमिपुत्रांवर विस्थापित होऊन देशोधडीला लागण्याचे गंभीर परिणाम सोसावेलागले. त्यांची फरफट सुरू झाली. कारण विकासाचीगंगा ज्यांच्यापर्यंत पोहोचली, ते लाभधारक स्वत:च्याच सुखसंपन्न ऐश्वर्यात लोळत पडले; तर राजकीय धुरंधरव प्रशासन, सत्ता आणि संपत्तीच्या डावपेचात अडकून पडले. बिस्थापितांचे दैन्य, दु:ख, दारिद्र्य कस्पटासमान मानले गेले. त्यातूनच, सांस्कृतिक स्थित्यंतराची प्रक्रिया सुरू आहे......समाजकल्याणासाठी विकासयोजनावाद उदयाला आला आणि विकासयोजनांमुळे शास्ते आणिशासित, शोषक आणिशोषित, प्रस्थापित आणि विस्थापित अशी द्वंद्वात्मकता निर्माण होऊ लागली.७

विसाव्या शतकाचे अंतिम पर्व स्फोटाचे पर्व म्हणून गणावेलागेल. इ.स. १९८० ते आजपर्यंतचा वर्तमान पाहिला, तरसर्व जगभरच स्फोटक परिस्थिती पहावयास मिळते. माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट, प्रबोधनचळवळी व अन्यायअत्याचारविरोधी आंदोलने, खाजगीकरण, उदारीकरणव जागतिकीकरणाची त्सुनामी, नॅनो तंत्रज्ञानव वापरा आणि फेका तंत्राचा बडेजाव, नैसर्गिक जैवस्त्रोतांची लयलूट, उपासमार वरोगराई, महागाई व आत्महत्या, त्सुनामी, नर्गिस, फयानसारखी चक्रिवादळे, ग्लोबल वॉर्मिंगचा भडका, शहरीकरणव महानगरीकरणांची वाढ, निसर्गाची आस आणि हव्यास, बायोटेक्नॉलॉजी, जागतिक दहशतवाद, पर्यावरणाचा ऱ्हास अशा एक ना अनेक धक्कादायक बाबींचा स्फोट ह्या काळात झालेलादिसतो. अर्थात प्रारंभापासून अनेक आंदोलनांनी तयार केलेली मानसिकता व त्यामुळे विस्थापित होण्यास नकार देण्याची जागृतताह्यागोष्टीहीह्यातूनच उदयास आल्या. रस्त्यावरचे युद्ध ही बाब देशोदेशांच्या आणि प्रांताप्रांतांच्या गल्ल्यांमध्ये आज पहावयास मिळत आहे. विकास कीविनाश, अशी द्वंद्वात्मक स्थिती आज निर्माण झालेली आहे.

## संदर्भ व टिपा :


१. अधिक तपशिलासाठी पहा: :कुलकर्णीराघवेंद्रव पवार विलास, जलआशय, ओम पब्लिकेशन, ठाणे, प्र.आ. : ८ मे २००२, पृ. १.

२. अधिक तपशिलासाठी पहा :राऊत गिरीश, सेतुसमुद्रम्‌चे सत्य(लेख), आंदोलन, डिसें.२००७, पृ.२१.

३. सखाराम शंकर, एसईझेड, सामंत पब्लिकेशन्स, मुंबई,प्र.आ.: २००७, पृ.५.

४. साठे सत्यरंजन, प्रस्तावना, पानशेत प्रलय आणि मी (मधुकरहेबळे), चंद्रकला प्रकाश, पुणे, प्र.आ. : १२ जुलै १९६१ पृ.५.

५. चितळे माधवराव, स्टॉकहोम पाणी परिषद, १३ ऑगस्ट १९९३, समा. राजकारण पाण्याचे (सुधीर भोंगळे), राजहंस प्रकाशन, पुणे, १ मार्च १९९८, पृ.३.

६ .केळकर न.चिं., (राष्ट्रीय सभा-नागपूर अधिवेशन) समा. मुळशी सत्याग्रह उ.नि. पृ.११.

७.पहा:कऱ्हाडेसदा, मानाचे पान झाडाझडती, ललित मार्च १९९३ पृ.२६.




219